|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

## वित्त (खरेदी) विभाग

जावक क्रमांक : उमवि/8/पी-02/ 10 /2019 दि.02.01.2019

प्रति,

सन इंपेक्स,

शॉप नं.6, जयश्री अपार्टमेंट, प्रार्थना समाज रोड,

विलेपार्ले (ई), मुंबई-400 057

**विषय :- स्टेशनरी व इतर साहित्याच्या पुरवठा न केल्यामुळे आपल्या फर्मचे नाव पुरवठादारांच्या काळ्या यादीत (Black List) समाविष्ट केल्याबाबत.**

संदर्भ :- 1) खरेदी आदेश क्र. 100003393, दि.27.08.2019
2) विद्यापीठ पत्र क्र.कबचौउमवि/8/पी 02/775/2019, दि.06.11.2019
3) विद्यापीठ पत्र क्र.कबचौउमवि/8/पी 02/789/2019, दि.13.11.2019
4) आपणाकडील दि.12.05.2019 रोजीचा ई-मेल

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, स्टेशनरी व इतर साहित्याच्या पुरवठ्याकरिता आपण भरलेल्या ई-निविदेनुसार आपणास विद्यापीठ खरेदी आदेश क्र.100003393 दि.27.08.2019 निर्गमित करण्यात आलेला होता. सदर खरेदी आदेशात एकुण 05 विविध प्रकारच्या साहित्याचा समावेश होता.

सदर बाबतीत साहित्य पुरवठा करीता आपणाशी वेळोवेळी दुरध्वनीने चर्चा झालेली आहे तसेच उपरोक्त संदर्भीय पत्राद्वारे/ई-मेलद्वारे स्टेशनरी साहित्याच्या त्वरीत पुरवठ्याबाबत कळविण्यात आलेले होते.तरी देखील आपण या बाबतीत कुठलीही कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे विद्यापीठाच्या कामकाजात अडचणी निर्माण होत आहे. तसेच आपणाकडून निविदेतील अटी व शर्तीचा भंग झालेला असुन विद्यापीठाच्या कामकाजात निर्माण झालेल्या अडचणींमुळे आपणावर खालील प्रमाणे कारवाई करण्यात येत आहे.

1) आपणास स्टेशनरी साहित्य पुरवठ्यापोटी दिलेला खरेदी आदेश क्र.100003393, दि.27.08.2019 रद्द करण्यात येत आहे.

2) खरेदी आदेशापोटी भरावयाची 5% सुरक्षा अनामत रक्कम रु.1376/- ही कायमस्वरुपी जप्त करण्यात येत असुन **आपल्या फर्मचे नाव विद्यापीठ पुरवठादारांच्या काळ्या यादीत (Black List) कायमस्वरुपी समाविष्ट करण्यात येत आहे, याची कृपया नोंद घ्यावी.**

कळावे,

आपला विश्वासु,

( डॉ. विवेक व्ही. काटदरे )
प्र - वित्त व लेखा अधिकारी

प्रत माहितीसाठी :

मा.कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि,जळगाव

☎ : (९१) ०२५७- (२२५७२३६, २३७.) वेबसाईट : www.nmu.ac.in
फॅक्स : (९१) ०२५७- (२२५८४०८) ई-मेल : pol@nmu.ac.in